Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे



"जगातील सर्वात शक्तिशाली रिसेट!"
(पान २ वर)

।शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६। वर्ष १ ।अंक ४ ।पाने २।
DIGITAL EDITION

» Selected

### 'मविआ' ची वेगवेगळी भूमिका हे षडयंत्र – सुजय विखे

अहिल्यानगर : महाविकास आघाडी बारामती पोटनिवडणुकीसाठी सर्व काही करू शकते तर राहुरीसाठी का करू शकत नाही? महाविकास आघाडीने राज्यस्तरावर या दोन वेगवेगळ्या भूमिका घेतल्या, यामागे एक षडयंत्र आहे. विखे कुटुंबीयांना हे षडयंत्र नवीन नाही, ते आम्ही पत्कारलेलेच आहे. त्याला तोंड देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या मागे आम्ही ताकद लावू, असे आव्हान भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार सुजय विखे यांनी दिले आहे. राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीतील भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचाराचे नियोजनासाठी माजी खासदार सुजय विखे यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. बैठकीत आमदार संग्राम जगताप उमेदवार कर्डिले उपस्थित होते.बारामती राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी वेगवेगळी भूमिका ठेवली, याकडे लक्ष वेधले असता सुजय विखे यांनी वरील प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, हे राजकारण त्यांच्या माध्यमातून बरेच जुने आहे आणि ते महाराष्ट्रात घडत आले आहे.

## हायकोर्टाचा महायुती सरकारला झटका

# तर 'लाडकी बहीण' योजना बंद करा

## निवृत्त कर्मचाऱ्यांना हक्काचे वेतन न दिल्याने न्यायालय संतप्त

जन सम्राट टाईम्स



मुंबई :महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना एकीकडे लोकप्रिय ठरत असताना, दुसरीकडे या योजनेवरून न्यायालयीन पातळीवर सरकारला फटकार बसली आहे. निवृत्त कर्मचाऱ्यांना हक्काचे वेतन आणि लाभ न मिळाल्याच्या मुद्द्यावरून मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातून निवृत्त झालेल्या एका महिला कर्मचाऱ्याला सातव्या वेतन आयोगानुसार पेन्शन आणि इतर लाभ मिळाले नव्हते. अनेक वेळा पाठपुरावा करूनही योग्य प्रतिसाद न मिळाल्याने संबंधित कर्मचाऱ्याने अखेर न्यायालयात धाव घेतली. या याचिकेवर सुनावणी दरम्यान न्यायालयाने प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर ताशेरे ओढले. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, "सरकारकडे पैसे नसतील, तर आकर्षक योजना राबवण्याऐवजी आधी कर्मचाऱ्यांचे हक्काचे पैसे द्या." 'लाडकी बहीण' योजनेचा संदर्भ देत न्यायालयाने सुनावले की, "जर पेन्शन देण्यासाठी निधी नसेल, तर अशा योजना बंद करा."

सुनावणीदरम्यान न्यायालयाने अधिकाऱ्यांच्या सुविधांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. "अतिरिक्त आयुक्तांना वेतन आणि सर्व सुविधा मिळतात, पण आयुष्यभर सेवा केलेल्या शिक्षकांसाठी पैसे नाहीत, हे आश्चर्यकारक आहे," असे न्यायालयाने नमूद केले. आठव्या वेतन आयोगाच्या चर्चेचा काळ सुरू असताना अजूनही सातव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी प्रलंबित असल्याबद्दलही कोर्टाने नाराजी व्यक्त केली. न्यायालयाने प्रशासनाला फटकारताना उपरोधिक भाषेत कठोर निरीक्षण नोंदवले. "पालिकेकडे पैसे नसतील, तर कार्यालयातील टेबल, खुर्च्या आणि एसी विकून पैसे उभे करा," असे सांगत न्यायालयाने कारभारातील विसंगती उघड केली. तसेच "महानगरपालिका आयुक्त आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आलिशान गाड्या विकण्याचा विचार करा, पण निवृत्त कर्मचाऱ्यांचे हक्काचे पैसे तातडीने द्या," असा स्पष्ट आदेश दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, निवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन देणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे आणि त्यांना यापासून वंचित ठेवता येणार नाही. प्रशासनाने कोणत्याही परिस्थितीत निधीची व्यवस्था करून तातडीने थकबाकी अदा करावी, असे निर्देशही देण्यात आले.

### सरकारपुढे मोठे आव्हान उभे

या निर्णयामुळे राज्य सरकार आणि पालिका प्रशासनावर दबाव वाढण्याची शक्यता असून, आगामी काळात या प्रकरणाचे राजकीय पडसाद उमटण्याची चिन्हे दिसत आहेत. एकीकडे कल्याणकारी योजनांचा विस्तार आणि दुसरीकडे आर्थिक शिस्त यांचा समतोल साधण्याचे मोठे आव्हान सरकारपुढे उभे ठाकले आहे.

### तातडीने थकबाकी अदा करावी

या प्रकरणातून एकीकडे सरकारच्या लोककल्याणकारी योजनांवर होणारा मोठा खर्च आणि दुसरीकडे कर्मचाऱ्यांच्या मूलभूत हक्कांकडे होत असलेले दुर्लक्ष यावर प्रश्न उपस्थित झाला आहे. 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्यात येतात. ही योजना सुरू झाल्यापासून विरोधकांकडून तिच्यावर सातत्याने टीका होत असतानाच आता न्यायालयानेही अप्रत्यक्षपणे यावर बोट ठेवले आहे.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी

# जखमी होऊनही कर्तव्य निभावले

## जवानाला ६० लाखांची मदत



जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** दहशतवाद्यांच्या भीषण हल्ल्यात गंभीर जखमी होऊनही आपल्या कर्तव्याशी तडजोड न करता सहकाऱ्यांचे प्राण वाचवणाऱ्या जळगावच्या जवान जावेद अहमद यांच्या शौर्याला राज्य शासनाने सलाम केला आहे. 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार योजना' अंतर्गत त्यांना सुमारे ६० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली असून, जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते हा धनादेश प्रदान करण्यात आला. या वेळी उपस्थित मान्यवरांनी जावेद अहमद यांच्या धाडसाचे कौतुक करत त्यांना अभिमानाने सलाम केला. देशसेवेसाठी जीवाची पर्वा न करता कर्तव्य बजावणारे जवान हे राष्ट्राचे खरे बळ असल्याचे सांगत पालकमंत्री पाटील म्हणाले, "जावेद अहमद यांच्यासारख्या शूर सैनिकांच्या धैर्यामुळेच देश सुरक्षित आहे. त्यांचा त्याग, निष्ठा आणि शौर्य प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे.
" चाळीसगाव तालुक्यातील पिलखोड गावचे सुपुत्र असलेले जावेद अहमद हे केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या १७९ बटालियनमध्ये कार्यरत होते. जम्मू-काश्मीरमधील अतिसंवेदनशील बारामुल्ला जिल्ह्यात त्यांनी कर्तव्य बजावत असताना १८ एप्रिल २०२० रोजी सोपोर परिसरात ही घटना घडली. कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामात असताना दहशतवाद्यांनी त्यांच्या वाहनावर अचानक अंदाधुंद गोळीबार केला. या भीषण हल्ल्यात जावेद अहमद गंभीर जखमी झाले. मात्र अशा जीवघेण्या परिस्थितीतही त्यांनी धैर्य न गमावता वाहन सुरक्षित ठिकाणी नेले. त्यांच्या या तत्पर निर्णयामुळे वाहनातील इतर सहकाऱ्यांचे प्राण वाचले.

### जवानांकडून प्रेरणा घेण्याचे आवाहन

कर्तव्यनिष्ठा, धाडस आणि प्रसंगावधान यांचा संगम असलेली ही घटना त्यांच्या शौर्याची साक्ष देणारी ठरली आहे. शूर जवानांकडून प्रेरणा घेण्याचे आवाहन या घटनेनंतर देशभरातून जवान जावेद अहमद यांच्या धैर्याचे कौतुक झाले होते. आता शासनाने त्यांच्या कार्याची अधिकृत दखल घेत आर्थिक मदतीच्या माध्यमातून सन्मान केल्याने जिल्ह्यात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. यावेळी पालकमंत्री पाटील यांनी तरुणांना देशसेवेचे महत्त्व पटवून देत अशा शूर जवानांकडून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. "देशासाठी काहीतरी करण्याची जिद्द आणि समर्पणभाव प्रत्येक तरुणामध्ये असावा.

# आता टोलनाक्यांवर शेतकरी बाजार

जन सम्राट टाईम्स



मुंबई : स्थानिक शेतकऱ्यांना आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण व्हावा. सर्व प्रकारच्या शेतीमालाला ग्राहक मिळावा, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या टोलनाक्यांच्या जवळील जागा शेतीमाल विक्रीसाठी भाड्याने देऊन शेतकरी बाजार सारखा उपक्रम प्रायोगिक तत्वावर राबविण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दिले आहेत. सार्वजनिक बांधकाम मंत्री भोसले यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव (बांधकामे) आबासाहेब नागरगोजे, सचिव (रस्ते) राजभोज आदी उपस्थित होते. या बैठकीत भोसले यांनी वरील आदेश दिले. राज्यातील विविध टोलनाक्यांवर स्थानिक शेतकरी फळे, भाज्या विकतात. अशा शेतकऱ्यांना टोल प्लाझाजवळच भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून दिल्यास शेतकरी बाजार सारखा उपक्रम राबविता येईल. यातून त्या स्थानिक शेतकऱ्यांच्या मालाला ग्राहक उपलब्ध होईल. शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवरच आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल. शेतीमालाच्या वाहतुकीचा खर्च, वेळ वाचेल. त्यासाठी राज्यातील ज्या टोलनाक्यांच्या शेजारी जागा उपलब्ध आहे, अशा ठिकाणच्या जागा भाडेतत्वावर देऊन प्रायोगिक तत्वावर शेतकरी बाजार हा उपक्रम राबविण्यात यावा, असे आदेश भोसले यांनी दिले आहेत. शेतकऱ्यांना टोल प्लाझाजवळच भाडेतत्वावर जागा उपलब्ध करून दिल्यास शेतकरी बाजार सारखा उपक्रम राबविता येईल. यातून त्या स्थानिक शेतकऱ्यांच्या मालाला ग्राहक उपलब्ध होईल. शेतकऱ्यांना स्थानिक पातळीवरच आर्थिक उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण होईल. नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणारी कामे, महामार्गावरील जनसुविधा केंद्रे यासह विविध विषयांचा मंत्री भोसले यांनी आढावा घेतला. कुंभमेळ्याची कामे दर्जेदार व्हावीत याकडे लक्ष द्यावे. कामांचा वेळोवेळी आढावा घ्यावा, अशा सूचनाही भोसले यांनी दिल्या.




जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज साताऱ्यात येऊन खासदार उदयनराजे भोसले यांची त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी अर्धा तास बंद दाराआड चर्चा केली.या वेळी आमदार मनोज घोरपडे, माजी आमदार आनंदराव पाटील, सातारा लोकसभा संयोजक सुनील काटकर, प्रतापगड प्राधिकरण समितीचे सदस्य काका धुमाळ, जिल्हा परिषद सदस्य अजित साळुंखे, सतीश भोसले, नगरसेवक पंकज चव्हाण, माजी नगरसेवक बाळासाहेब ढेकणे, कल्याण राक्षे, ॲड. विनीत पाटील, लक्ष्मण कडव आदी उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# जळगाव जि.प.च्या सीईओपदी करिश्मा नायर

## पदभार स्वीकारताच 'ॲक्शन मोड'वर



जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी करिश्मा नायर यांनी आज औपचारिकरित्या पदभार स्वीकारला. सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारतीतील दालनात त्यांनी कार्यभार हाती घेताच तत्काळ कामकाजाला सुरुवात केली. या वेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी यांच्या हस्ते त्यांना पदभार सुपूर्द करण्यात आला.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेतील सर्व विभागप्रमुख उपस्थित होते. माजी मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांची मुंबई येथे 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पा'च्या अभियान संचालकपदी बदली झाल्यानंतर त्यांच्या जागी करिश्मा नायर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी त्या नाशिक महानगरपालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून कार्यरत होत्या. पदभार स्वीकारल्यानंतर करिश्मा नायर यांनी तात्काळ 'ॲक्शन मोड'मध्ये काम सुरू करत प्रशासकीय कार्यपद्धतीत वेग आणण्याचे संकेत दिले. त्यांनी जिल्हा परिषदेच्या नवीन तसेच जुन्या अशा दोन्ही प्रशासकीय इमारतींमधील सर्व विभागांना भेट देत प्रत्यक्ष कामकाजाचा आढावा घेतला.

### कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला

प्रत्येक विभागात जाऊन त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी आणि कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला. कर्मचाऱ्यांच्या टेबलवर जाऊन कामकाजाची माहिती घेत त्यांनी प्रलंबित कामे, अडचणी आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीची स्थिती जाणून घेतली. यावेळी त्यांनी कामकाज अधिक परिणामकारक आणि लोकाभिमुख करण्यासाठी आवश्यक सूचना व मार्गदर्शनही केले. जिल्हा परिषद प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यावर भर देणार असल्याचे संकेत त्यांच्या पहिल्याच दिवशीच्या कार्यपद्धतीतून दिसून आले.

# खते, बियाणे, कीडनाशकांच्या भेसळीला लगाम बसणार?

जन सम्राट टाईम्स

मुंबई : मुंबई : केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या मतदारसंघात बोगस कीडनाशकामुळे संपूर्ण पीक जळाल्याचा प्रकार घडला होता. त्यामुळे नुकत्याच जयपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय कृषी परिषेदत चौहान यांनी घटकराज्यांच्या कृषिमंत्र्यांना खते, रसायने, बियाणे आणि कीडनाशकांच्या भेसळीवर कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्यामुळे राज्य सरकारने प्रत्येक तालुक्यात निरीक्षक नेमण्याचा निर्णय घेतला आहे. देशातील पश्चिमेकडील राज्याच्या कृषिमंत्र्यांची नुकतीच जयपूर येथे परिषद झाली. या परिषदेत केंद्रीय कृषिमंत्र्यांनी आपल्या लोकसभा मतदारसंघात बोगस कीडनाशकामुळे पीक जळून गेल्याचा प्रकार घडल्याचे सांगितले. राज्यस्थानच्या कृषिमंत्र्यांनी डीएपी खतामध्ये संगमरवर दगडाच्या भुकटीची भेसळ केल्याचा प्रकार घडल्याचे सांगितले. प्रत्येक तालुक्यात एक किंवा किमान शंभर निविष्ठा विक्रेत्यांमागे एक निरीक्षक नेमण्यात आला आहे. जिल्हास्तरावर एक आणि प्रत्येक विभागाला एक निरीक्षक असणार आहे.

# जळगावात 'दिक्षाभूमी' उभारण्याची मागणी

## रमाई फाउंडेशनकडून महापौरांना निवेदन; प्रस्तावित प्रकल्पासाठी निधीची मागणी

जन सम्राट टाईम्स

जळगाव : नागपूर येथील दिक्षाभूमीच्या धर्तीवर जळगाव शहरात भव्य 'दिक्षाभूमी' उभारण्यात यावी, अशी मागणी रमाई फाउंडेशन, जळगाव यांच्या वतीने महापौरांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या उपक्रमासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करावा, अशीही विनंती करण्यात आली आहे. जळगाव शहरात दिक्षाभूमी उभारण्याचा प्रस्ताव नवीन नसून, २०१४ साली खान्देश विकास आघाडीने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मांडला होता. त्यानंतर २०२२ मध्ये माजी महापौर जयश्री महाजन यांनी महासभेत यासंदर्भातील ठराव मांडला होता. या ठरावाला एकमुखी मान्यता मिळाली असून, पिंप्राळा शिवारात जागाही निश्चित करण्यात आली होती. मात्र, शासकीय निधीच्या अभावामुळे हा प्रकल्प अद्याप प्रत्यक्षात साकार होऊ शकलेला नाही. त्यामुळेच आता पुन्हा एकदा या प्रकल्पाला गती देण्यासाठी रमाई फाउंडेशनने पुढाकार घेतला आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, दिक्षाभूमी हे केवळ धार्मिक स्थळ नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व असलेले केंद्र ठरू शकते. गौतम बुद्ध यांच्या शांततेच्या, समतेच्या आणि मानवतेच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी अशा स्थळाची गरज असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले आहे. तसेच, जळगावसारख्या शहरात दिक्षाभूमी उभारल्यास पर्यटनाला चालना मिळेल, तसेच सामाजिक एकात्मता वाढीस लागेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महापौरांनी या प्रकल्पासाठी शासनाकडे पाठपुरावा करून आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा आणि लवकरात लवकर भव्य दिक्षाभूमी उभारण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी ठाम मागणी रमाई फाउंडेशनच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीमुळे शहरात पुन्हा एकदा दिक्षाभूमी प्रकल्पाचा मुद्दा चर्चेत आला असून, प्रशासन यावर कोणती भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# सख्ख्या भावासारखे; फोडाफोडी करणे आमच्या रक्तात नाही'

## 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांना ऊत; बावनकुळे यांचा फोडाफोडीच्या आरोपांवर पलटवार

जन सम्राट टाईम्स

अकोला : महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांनी पुन्हा जोर धरला असून, या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेकडून 'ऑपरेशन टायगर' राबवून उद्धव ठाकरे गटातील खासदारांना आपल्या पक्षात आणण्याच्या हालचाली सुरू असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. मात्र, या वृत्ताचे ठाकरे गटाकडून ठामपणे खंडन करण्यात आले आहे. दरम्यान, भाजप नेते तथा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या चर्चांवर प्रतिक्रिया देताना सत्ताधारी महायुतीत कोणतेही मतभेद नसल्याचा दावा केला. "देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे हे सख्ख्या भावासारखे एकत्र काम करत आहेत. आमचे सरकार अत्यंत विश्वासाने आणि एकदिलाने काम करत आहे. फोडाफोडी करणे आमच्या रक्तात नाही," असे त्यांनी ठामपणे सांगितले. बावनकुळे यांनी यावेळी ठाकरे गटावर टीकास्त्र सोडताना महायुतीचा धर्म उद्धव ठाकरे यांनीच मोडला असल्याचा आरोप केला. "उद्धव ठाकरे यांनी महायुती सोडून काँग्रेससोबत हातमिळवणी केली. त्यांच्या सरकारच्या काळात आमदारांमध्ये अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले



होते. त्यामुळेच अनेक आमदारांनी पक्ष सोडला," असे ते म्हणाले. सध्याच्या राजकीय घडामोडींवर भाष्य करताना त्यांनी स्पष्ट केले की, "आज महाराष्ट्रात 217 आमदारांचे मजबूत सरकार आहे. हे सरकार एकदिलाने काम करत असून विकासाला प्राधान्य देत आहे." याचबरोबर खासदारांच्या भेटीगाठींवरून निर्माण होणाऱ्या चर्चांनाही त्यांनी फेटाळून लावले. "कोणताही आमदार किंवा खासदार सरकारमधील नेत्यांना भेटला, तर त्याचा अर्थ राजकीय हालचाली असा होत नाही. ते आपल्या मतदारसंघाच्या विकासासाठीच येतात. त्यामुळे अशा भेटींवरून संशय घेणे चुकीचे आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अकोला जिल्ह्यातील मूर्तीजापूर तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' कार्यक्रमानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. या योजनेविषयी माहिती देताना त्यांनी सांगितले की, राज्यभरात विविध टप्प्यांत शिबिरे आयोजित केली जात असून, 10 एप्रिल रोजी 450 हून अधिक शिबिरे पार पडली आहेत. पुढील टप्पे 17 एप्रिल, 8 मे आणि 15 मे रोजी होणार आहेत.

### 25 हजार लाभार्थ्यांना योजनांचा लाभ

या शिबिरांद्वारे शासनाच्या तब्बल 48 योजना थेट नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवण्याचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. "पणन रस्ते, तुकडेबंदी कायदा, पट्टे वाटप, स्वामित्व योजना अशा विविध उपक्रमांद्वारे सामान्य नागरिकांना दिलासा देण्याचे काम सुरू आहे," असे त्यांनी नमूद केले. अकोला जिल्ह्यात आतापर्यंत तीन शिबिरांद्वारे सुमारे 25 हजार लाभार्थ्यांना योजनांचा लाभ देण्यात आला असून, आगामी शिबिरांत आणखी 25 हजार कुटुंबांपर्यंत योजना पोहोचवण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. दरम्यान, 'ऑपरेशन टायगर'च्या चर्चांमुळे राज्यातील राजकारण पुन्हा तापले असून, येत्या काळात या घडामोडी कोणते वळण घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

» Selected

## नाशिकमधील महिला शोषणावर मौन का?

नागपूर : राज्यात महिलांच्या लैंगिक शोषणाच्या घटना समोर येत असताना सत्ताधारी नेते मौन बाळगत असल्याची काँग्रेस नेते टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. 'लव्ह जिहाद'सारख्या मुद्द्यांवर भूमिका घेणारे भाजप नेते प्रत्यक्ष महिलांच्या शोषणाच्या प्रकरणांवर गप्प का, असा सवाल उपस्थित करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नाशिकमधील एका कॉर्पोरेट कंपनीत महिलांचे शोषण झाल्याच्या प्रकरणावर सत्ताधारी भाजप, शिंदे गट आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे नेते गप्प का आहेत, असा सवाल वडेट्टीवार यांनी केला. चांगल्या घरातील महिलांवर अन्याय होत असताना सरकारमधील लोकांचे "तोंड शिवले आहे का?" असा टोला त्यांनी लगावला.

## ओमराजे निंबाळकरही शिवसेनेच्या वाटेवर?

संभाजीनगर : संजय जाधव यांच्याबरोबर आता खासदार ओम राजे निंबाळकर हेही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाण्याची तयारी करत असल्याच्या चर्चांनी शुक्रवारी पुन्हा जोर धरला. मात्र, या चर्चा निरर्थक असल्याचा दावा त्यांनी समर्थकांनी केल्या आहेत. केवळ शिवसेनेतील नवे प्रवेशच नाही तर सेना मंत्र्यांच्या खात्यातही बदल करण्याच्या हालचाली सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. आबिटकर यांनी या राजकीय हालचालींबाबत बोलताना 'आगे आगे देखा होता है क्या ' असे हिंदीमध्ये म्हणत ' ऑरेशन टायगर' ची चर्चेस पुन्हा गती दिली.

# "जगातील सर्वात शक्तिशाली रिसेट!"

## डोनाल्ड ट्रम्प यांची सूचक पोस्ट

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** अमेरिका आणि इराणमधील तणाव निवळण्यासाठी पाकिस्तानमध्ये होणाऱ्या ऐतिहासिक चर्चेच्या काही तास आधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या 'ट्रुथ सोशल' प्लॅटफॉर्मवर एक अत्यंत सूचक पोस्ट शेअर केली आहे. "जगातील सर्वात शक्तिशाली रिसेट", असे ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. ट्रम्प यांच्या या पोस्टमुळे जागतिक राजकारणात मोठ्या बदलांचे संकेत असल्याचे मानले जात आहे. अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स इराणच्या शिष्टमंडळाशी वाटाघाटी करण्यासाठी इस्लामाबादकडे रवाना झाले आहेत. असे असताना राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची 'ट्रुथ सोशल'वरील पोस्ट चर्चेचा विषय ठरली आहे. अमेरिका आणि इराणमधील संघर्षावर तोडगा काढण्यासाठी शनिवारी इस्लामाबादमध्ये या महत्त्वपूर्ण चर्चेला सुरुवात होणार आहे. व्हाईट हाऊसने दिलेल्या माहितीनुसार, या चर्चेत अमेरिकन शिष्टमंडळाचे नेतृत्व स्वतः उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स करणार आहेत. दरम्यान, इराणविरुद्ध युद्धविराम जाहीर केल्यानंतर ट्रम्प यांनी हा अमेरिकेचा विजय असल्याचे म्हटले होते.उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स इस्लामाबादकडे रवाना होण्यापूर्वी त्यांनी इराणला स्पष्ट इशारा दिला. "पाकिस्तानमध्ये होणाऱ्या शांतता चर्चेकडे आम्ही सकारात्मक दृष्टीकोनातून पाहत आहोत, इराणने भावनांशी खेळण्याचा प्रयत्न करु नये", असा इशारा व्हान्स यांनी दिला आहे. उपराष्ट्रपती जेडी व्हान्स अमेरिकेच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व करत असून, त्यात व्हाईट हाऊसचे मध्यपूर्वेतील दूत स्टीव्ह विटकॉफ आणि ट्रम्प यांचे जावई जेरेड कुशनर यांचा समावेश असण्याची शक्यता आहे.इराणकडून या चर्चेसाठी कोण उपस्थित राहणार हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे. दरम्यान, समोर आलेल्या माहितीनुसार, इराणच्या बाजूने, संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकेर कलिबाफ, परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आणि सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे नवनियुक्त सचिव मोहम्मद बाकेर झोलकाद्र हे या चर्चेत सहभागी होणार असल्याचे म्हटले जाते.

### कोणत्या मुद्यांवर होणार चर्चा?

दरम्यान, अमेरिका आणि इराण यांच्या दोन आठवड्यांसाठी युद्धविराम झाला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याच्या अटीवर युद्धविरामाचा निर्णय घेतल्याचे ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे. पाकिस्तनमध्ये होणाऱ्या वाटाघाटीत होर्मुझचा मुद्दा अत्यंत महत्वाचा ठरणार आहे. तसेच, युरेनियमचे संवर्धन आणि अण्वस्त्र निर्मिती व युद्धात झालेली नुकसान भरपाई याबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. शिवाय इराण यावेळी लेबनॉनचा मुद्दा देखील उपस्थित करु शकते.

# सामाजिक विकासातून समाजबंध अधिक दृढ !

## बडगुजर समाजाच्या सभागृहाचे लोकार्पण

जन सम्राट टाईम्स



**पाळधी/धरणगाव /जळगाव:** "धरणगाव शहरात आतापर्यंत २२ पेक्षा अधिक विविध सामाजिक सभागृहांची कामे मंजूर करून जवळपास अनेक पूर्णत्वास आणली आहेत. यासाठी सुमारे ९ कोटींचानिधी उपलब्ध करून दिला आहे. बडगुजर समाजाच्या मागणीनुसार उभारलेले हे सुंदर सभागृह समाजाच्या एकतेसाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमांसाठी आणि विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी उपयोगी पडावे अशी अपेक्षा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केली.

धरणगाव शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक उभारणीला नवी दिशा देणारा एक भावनिक आणि ऐतिहासिक क्षण आज अनुभवायला मिळाला. जिल्हा वार्षिक योजना (डीपीडीसी) अंतर्गत मंजूर २३ लाख रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या बडगुजर समाजाच्या सामाजिक सभागृहाचे लोकार्पण पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. याप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी बडगुजर समाजाच्या वतीने पालकमंत्र्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुषार बडगुजर यांनी केले, तर प्रास्ताविकात बडगुजर पंचमंडळाचे धरणगाव अध्यक्ष मनोहर बडगुजर यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिलेले हे सभागृह आणि चामुंडा माता मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी केलेली वैयक्तिक मदत आमच्या विधान समाजाच्या कायम स्मरणात राहील. आभार सुमित बडगुजर यांनी मानले. कार्यक्रमात नगराध्यक्ष लीलाताई चौधरी तसेच चर्मकार समाजाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे यांनी हे सामाजिक सभागृह म्हणजे समाजातील एकोप्याचा आणि विकासाच्या वाटचालीचा प्रेरणादायी उत्सव असल्याचे आपल्या मनोगतातून या उपक्रमाचे कौतुक केले.

### सांस्कृतिक उभारणीला नवी दिशा

बडगुजर समाजाच्या मागणीनुसार उभारलेले हे सुंदर सभागृह समाजाच्या एकतेसाठी, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमांसाठी आणि विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी उपयोगी पडावे अशी अपेक्षा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केली. धरणगाव शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक उभारणीला नवी दिशा देणारा एक भावनिक आणि ऐतिहासिक क्षण आज अनुभवायला मिळाला.

### यांची होती विशेष उपस्थिती

या कार्यक्रमाला नगराध्यक्ष चौधरी, उपनगराध्यक्ष सुरेखा विजय महाजन, नगरपरिषद गटनेते विलास महाजन, माजी नगरसेवक पप्पू भावे , शिवसेना शहरप्रमुख धीरज पूर्भे, नगरसेवक बुटा पाटील, अंजली विसावे, संजय महाजन, पवन महाजन, कैलास माळी, पुनीलाल महाजन, वाल्मिक पाटील, भानुदास विसावे, ललित येवले, बाळासाहेब जाधव यांच्यासह शिवसेना व युवा सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, बडगुजर पंचमंडळाचे सदस्य आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# 'एकरकमी कर्ज परतफेड योजना' राबबा

## बाबासाहेब पाटील यांचे निर्देश

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** राज्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांमधील थकबाकीदार शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'एकरकमी कर्ज परतफेड योजना' (ओटीएस) प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले. मंत्रालयात सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली या योजनेबाबत आढावा बैठक झाली. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, या योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करणे आवश्यक आहे. जिल्हा पातळीवरील देखरेख यंत्रणा अधिक सक्षम करून योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावा, असे निर्देश त्यांनी दिले. राज्यातील अनेक प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था अनिष्ट तफावतीमध्ये असल्यामुळे सभासदांना कर्जपुरवठ्यात अडचणी निर्माण होत आहेत. या संस्थांना इष्ट तफावतीत आणण्यासाठी सुधारित प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला असून, योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक कार्यपद्धती, पात्रता निकष तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विकास संस्थांची भूमिका याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी कर्जदारांनी अर्ज सादर करण्याची प्रक्रिया, बँक खात्यात रक्कम जमा करण्याच्या अटी, अर्जांची छाननी व मंजुरीची कार्यपद्धती यासंदर्भात स्पष्ट मार्गदर्शक तत्वांवरही विचारविनिमय करण्यात आला. बैठकीत प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था व विकास संस्थांमधील थकबाकीदार शेतकऱ्यांना दिलासा देऊन त्यांचा पतदर्जा सुधारावा, संस्था स्तरावरील कर्जवसुलीला चालना मिळावी, सहकारी संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### अर्ज करणे आवश्यक

या योजनेअंतर्गत दि. ३० जून २०२३ अखेरपर्यंतची थकीत पिककर्जे तसेच मध्यम व दीर्घ मुदतीच्या शेती कर्जाचे थकीत हप्ते समाविष्ट आहेत. एका सभासदाकडे एकापेक्षा अधिक कर्जखाती असल्यास ती सर्व खाती योजनेसाठी पात्र ठरणार आहेत. ही योजना सुरुवातीस एक वर्षासाठी लागू राहणार असून संस्था योजना स्वीकारल्यानंतर सभासदांनी एक महिन्याच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज करताना एकूण थकबाकीच्या १० टक्के रक्कम जमा केलेल्या चलनाची प्रत जोडणे आवश्यक राहील.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल'सारख्या शब्दांवर शासनाचे निर्बंध!

## फसवणूक रोखण्यासाठी कठोर पाऊल

जन सम्राट टाईम्स



**मुंबई :** महाराष्ट्र शासनाने खासगी शाळांच्या नावांमध्ये दिशाभूल करणाऱ्या शब्दांच्या वापरावर कठोर निर्बंध घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. 'इंटरनॅशनल', 'ग्लोबल', 'वर्ल्ड' आणि 'युनिव्हर्सल' यांसारखे आकर्षक शब्द आता केवळ अधिकृत आंतरराष्ट्रीय मान्यता किंवा संलग्नता असलेल्या शाळांनाच वापरता येणार आहेत. अन्यथा अशा शब्दांचा वापर पूर्णपणे बंद करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामागे पालक व विद्यार्थ्यांची होणारी फसवणूक रोखण्याचा उद्देश आहे.

अनेक शाळा नावात भव्य शब्द वापरून उच्च दर्जाच्या शिक्षणाचा आभास निर्माण करतात; मात्र प्रत्यक्षात त्या दर्जाची सुविधा किंवा मान्यता नसल्याचे प्रकार समोर आले होते.

या पार्श्वभूमीवर शासनाने कठोर भूमिका घेतली आहे. याशिवाय 'कॉन्व्हेंट' तसेच 'सेना' किंवा 'सैनिक' यांसारख्या शब्दांच्या वापराबाबतही स्पष्ट नियमावली तयार करण्यात आली आहे. संबंधित शासकीय किंवा अधिकृत परवानगी नसताना अशा शब्दांचा वापर केल्यास संबंधित संस्थांवर कारवाई करण्यात येणार आहे. शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या स्पर्धेमुळे अनेक शाळा पालकांना आकर्षित करण्यासाठी नावांमध्ये भ्रामक शब्दांचा वापर करत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे पालक चुकीच्या समजुतीतून अशा शाळांमध्ये प्रवेश घेतात. आता या निर्णयामुळे अशा प्रकारांना आळा बसणार आहे.

### अचूक माहिती मिळेल

शासनाच्या या निर्णयामुळे शाळांच्या नावांमध्ये पारदर्शकता येण्यास मदत होईल, तसेच शिक्षण क्षेत्रातील भ्रामक जाहिरात आणि मार्केटिंग पद्धतींवर नियंत्रण मिळवता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पालकांना शाळा निवडताना अधिक स्पष्ट आणि अचूक माहिती मिळेल, हे या निर्णयाचे प्रमुख वैशिष्ट्य मानले जात आहे.

# मुंढे यांची बदलीच्या ठिकाणी रूजू होण्यापूर्वी 'पुन्हा बदली'!

जन सम्राट टाईम्स

मुंबई : तडफदार व 'मिस्टर क्लीन' अधिकारी म्हणून ख्याती असलेल्या तुकाराम मुंढे यांची मागच्या आठवड्यात करण्यात आलेली बदली ते नव्या ठिकाणी रुजू होण्यापूर्वी आश्चर्यकारकरित्या अंधातरी ठेवण्यात आली आहे. परिणामी, मुंढे पदाच्या प्रतीक्षेत आहेत. मुंढे यांना नव्या ठिकाणी रुजू होवू न देण्यास नाशिक कुंभमेळ्याच्या प्रस्तावित कामांच्या आर्थिक उलाढालीची किनार असल्याची चर्चा रंगली आहे. सामान्य प्रशासन विभागाने भारतीय प्रशासन सेवेतील १० अधिकाऱ्यांच्या ३१ जानेवारी रोजी बदल्या केल्या. त्यामध्ये तुकाराम मुंढे यांना 'दिव्यांग सक्षमीकरण विभागा'च्या सचिव पदावरुन हटवून 'आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभागा'चे सचिवपद दिले होते. 'आपत्ती व्यवस्थापन विभागा'च्या प्रधान सचिव पदावरुन हटवून विनिता वैद सिंगल यांना 'मृद व जल संधारण विभागा'च्या प्रधान सचिवपदी नियुक्ती दिली गेली. तर मुंढे सचिव असलेल्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या सचिवपदी माणिक गुरसाळ यांची नियुक्ती करण्यात आली होती.

# भोसरी -चाकणमध्ये महापौर लांडगे यांच्या पुढाकारातून 'महापौर युवा संकल्प रोजगार केंद्रा'चा शुभारंभ!

जन सम्राट टाईम्स



**पिंपरी-चिंचवड** आणि परराज्यातील हजारो तरुण-तरुणी रोजगाराच्या शोधात पिंपरी-चिंचवड आणि चाकण या औद्योगिक नगरीत येत असतात. मात्र, योग्य मार्गदर्शनाअभावी अनेकदा त्यांची आर्थिक फसवणूक होते, तर कधी नोकरीसाठी मोठी रक्कम मागितली जाते. तरुणांची ही वणवण थांबवण्यासाठी आणि त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि बाबासाहेब लांडगे यांच्या संकल्पनेतून 'महापौर युवा संकल्प रोजगार, कौशल्य विकास व करिअर मार्गदर्शन केंद्र' भोसरी आणि चाकण येथे सुरू करण्यात आले आहे. भोसरी येथील संविधान चौका जवळ असलेल्या फुगे प्रायमा येथे 'महापौर युवा संकल्प रोजगार, कौशल्य विकास व करिअर मार्गदर्शन केंद्र' या कार्यालयाचे उद्घाटन (दि.९) महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ संजय झोपे, संदीप पलांडे, प्रकाश लांडगे, कैलास लांडगे,प्रथमेश शेलार, आकाश कंद, प्रतीक शिंदे, ॲड प्रतीक बोराडे, संदीपक राठी, निखिल मसने, प्रशांत पवार, रुपेश खोपडे, जयश्री वाघमोडे, कांचन जगताप, कृष्णा अगरवाल, अब्दुल अहमद आदी उपस्थित होते. या केंद्राच्या वैशिष्ट्यांबद्दल माहिती देताना महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की,ज्या मुलांकडे कौशल्य आहे पण आर्थिक परिस्थितीमुळे ते मागे पडतात, अशा शेवटच्या घटकातील मुला-मुलींना या केंद्रातून १००% मोफत सेवा मिळणार आहे.बाहेरून येणाऱ्या अनेक होतकरू मुलांना राहण्याची जागा शोधण्यापासून ते जॉब मिळवण्यापर्यंत प्रचंड मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागतो. अनेकदा एजंटकडून त्यांची फसवणूक केली जाते. हा अन्याय थांबवण्यासाठी आम्ही ही केंद्रे पूर्णपणे 'विनामूल्य' सुरू केली आहेत.

# स्वीकृत नगरसेवक पदासाठी 'घंटानाद' आंदोलन

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना भेट देणार घंटा...

जन सम्राट टाईम्स

पिंपरी : पिंपरी -चिंचवड महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवक पदावर नियुक्ती व्हावी या मागणीसाठी भारतीय जनता पक्षाच्या जुन्या कार्यकर्त्यांकडून आता अनोख्या आंदोलनाची तयारी सुरू झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालय व 'वर्षा' निवासस्थानी सदिच्छा भेट घेऊन 'घंटा भेट' देत आपल्या भावना व्यक्त करण्याचा निर्णय कार्यकर्त्यांनी घेतला आहे. शहरातील जुन्या कार्यकर्त्यांना स्वीकृत नगरसेवक पदावर संधी देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात येणार आहे. अनेक वर्षे पक्ष संघटनेसाठी काम करूनही योग्य संधी मिळत नसल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढली आहे. कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, पिंपरी-चिंचवड शहरातील विविध नागरी समस्या सोडवण्यासाठी त्यांनी सातत्याने मोर्चे, आंदोलने केली. या आंदोलनांमुळे अनेक वेळा त्यांच्यावर पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हेही दाखल झाले. तरीही पक्षाकडून त्यांना अपेक्षित सन्मान मिळालेला नाही, अशी खंत व्यक्त होत आहे. विशेषतः प्रभाग क्रमांक 13 मध्ये 2017 साली भाजपचे दोन नगरसेवक निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी मोठे प्रयत्न केले होते. आगामी निवडणुकीत तीन नगरसेवक निवडून आणण्यासाठीही त्यांनी जोरदार तयारी केली. मात्र, त्यानंतरही स्वीकृत नगरसेवक पदासाठी त्यांची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. कार्यकर्त्यांनी असा आरोपही केला आहे की, इतर पक्षांमध्ये — विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गट आणि शरद पवार गटात — नवीन कार्यकर्त्यांना निवडणुकीत तिकीट देण्यात येत आहे, तर जुन्या कार्यकर्त्यांना संघटनात्मक कामासाठीच थांबवले जात आहे. याशिवाय शहरातील काही प्रमुख नेते — शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार उमा खापरे, अमित गोरखे — हे जुन्या कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करत असल्याची नाराजीही व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर 13 एप्रिल 2026 रोजी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन 'घंटा भेट' देण्यात येणार असून, कार्यकर्त्यांच्या भावना थेट त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. भाजप कार्यकर्ता सचिन काळभोर यांनी सांगितले की, "आम्ही अनेक वर्षे पक्षासाठी प्रामाणिकपणे काम केले आहे. शहरातील नागरी समस्या सोडवण्यासाठी अहोरात्र झटत आहोत.

# एसटीकडून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दिलासा

जन सम्राट टाईम्स

मुंबई : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला असून, त्यांच्या मोफत प्रवास सवलतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. पारंपरिक पास प्रणालीऐवजी आता 'रुपे ऑन द गो' सक्षम राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड प्रणालीचा अवलंब करण्यात येणार असून, यामुळे प्रवास अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल होणार आहे.

एसटी महामंडळातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसह त्यांच्या पत्नीच्या मोफत प्रवास सवलतीबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयानुसार, सेवानिवृत्त कर्मचारी, तसेच अपघातग्रस्त किंवा निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पत्नी/पतींनाही एप्रिल २०२६ पासून वर्षभर मोफत प्रवासाची सुविधा मिळणार आहे. एसटीच्या विविध बससेवांमधून प्रवास करताना केवळ नाममात्र फरकाची रक्कम भरून ही सवलत मिळवता येणार आहे. एनसीएमसी कार्डची नोंदणी व वितरण प्रक्रिया राज्यभरातील आगारांमध्ये अधिकृत दलालामार्फत राबवली जाणार असून, ही यंत्रणा एनएसडीएल पेमेंट बँकेच्या माध्यमातून कार्यान्वित केली जाईल.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# धरणगावातून 'खाज्याजी नाईक स्मृती कलश यात्रा'चा भक्तिमय शुभारंभ

## आंबापाणी लढ्याच्या स्मृती जागविण्यासाठी तीन दिवसीय यात्रा

जन सम्राट टाईम्स



धरणगाव :क्रांतिकारी खाज्याजी नाईक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या 'खाज्याजी नाईक स्मृती कलश यात्रा'चा आज धरणगाव येथून भक्तिमय वातावरणात शुभारंभ झाला. तीन दिवस चालणारी ही यात्रा धरणगाव, चोपडा आणि शिरपूर या तालुक्यांतून मार्गक्रमण करत ११ एप्रिल रोजी आंबापाणी येथे समारोप होणार आहे. या यात्रेत आकर्षक चित्ररथांच्या स्वरूपातील तीन वाहने सहभागी झाली असून, सुमारे २० कार्यकर्ते व भजनी मंडळ यांचा उत्साहपूर्ण सहभाग दिसून आला. भजन-कीर्तन, ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या यात्रेमुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. गावोगावी नागरिकांकडून यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत होत असून, ठिकठिकाणी पूजन आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यात्रेच्या पहिल्या दिवशी (९ एप्रिल) धरणगाव तालुक्यातील स्मृती मंदिर, हिंगोणे बु. आणि हिंगोणे खु., पिंप्री, हनुमंतखेडे, सोनवद, बाभूळगाव, अहिरे, भामर्डी आणि खर्दे या गावांमधून यात्रा मार्गक्रमण करत नांदेड येथे मुक्कामी थांबली. या टप्प्यात स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत यात्रेचे स्वागत केले. दुसऱ्या दिवशी (१० एप्रिल) ही यात्रा चोपडा तालुक्यात प्रवेश करून चहार्डी, मालापूर, बोरअजंटी, वैजापूर, शेनपाणी, खाऱ्यापाडा, गौऱ्यापाडा, उमरटी आणि मोरचिडा या गावांमधून मार्गक्रमण करणार आहे. या दिवशी सत्रासेन येथे यात्रेचा मुक्काम असेल.

### सामाजिक एकात्मता आणि सांस्कृतिक जाणीव

यात्रेसोबत खाज्याजी नाईक संस्थेचे अध्यक्ष भाईदासजी सोनवणे, संचालक सोमनाथ भिल, समीर शिंदे, संजय महाराज, पिंटूभाऊ पावरा, जामलाल महाराज, दत्ता पावरा, सोनू भादले, प्रवीण पवार यांसह अनेक कार्यकर्ते आणि जनजाती समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या उपक्रमामुळे इतिहासाची उजळणी होत असून, सामाजिक एकात्मता आणि सांस्कृतिक जाणीव वृद्धिंगत करण्यासाठी ही यात्रा महत्त्वपूर्ण ठरत आहे.

# नक्की कसली भीती सतावतेय?

## मेलानियाचे एपस्टीनसंबधित आरोपांवर स्पष्टीकरण

जन सम्राट टाईम्स

सर्व जगाचे लक्ष अमेरिका-इराण युद्धविराम आणि त्यानंतर होऊ घातलेल्या शांतता चर्चेवर लागले असताना मेलानिया ट्रम्प यांनी गुरुवारी एक विशेष पत्रकार परिषद घेतली. मेलानिया यांनी या पत्रकार परिषदेत लैंगिक अत्याचार प्रकरणातील गुन्हेगार जेफ्री एपस्टीन यांच्याशी निगडीत प्रकरणावर स्पष्टीकरण दिले. व्हाईट हाऊसमधून मेलानिया यांनी केलेल्या संबोधनात एपस्टीनबरोबर कुठलेही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. मेलानिया यांनी स्पष्टीकरण देण्यासाठी हीच वेळ का निवडली यावरुन आता प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शिवाय त्यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाचा अर्थ देखील लावण्याचा प्रयत्न केला जात आहे."माझी एपस्टीनबरोबर कधीच मैत्री नव्हती. न्यूयॉर्क शहरात डोनाल्ड ट्रम्प, माझे आणि एपस्टीनचे मित्र बऱ्यापैकी एक असल्याने त्याने ठेवलेल्या पार्टीत जाण्याचा योग यायचा. स्पष्ट सांगायचे तर माझे आणि एपस्टीनचे कधीच संबंध नव्हते आणि त्यांच्याशी निगडीत इतर कोणाशी माझा संबंध होता. त्याचा सहकारी घिलेन मॅक्सवेल याच्याशी माझा संबंध नाही", असे स्पष्टीकरण मेलानिया ट्रम्प यांनी पत्रकार परिषदेत दिले. इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर तणावाचे वातावरण असताना मेलानिया यांनी घाईत घेतलेल्या पत्रकार परिषदेवर प्रश्न उपस्थित केले जात आहे. मेलानिया यांनी व्हाईट हाऊसमध्ये येत थेट हातातील निवेदन वाचण्यास सुरुवात केली."जेफ्री एपस्टीनवरुन करण्यात येणारे आरोप आजपासूनच थांबायला हवेत", असे त्यांनी स्पष्ट केले. पण, कोणते आरोप याची माहिती त्यांनी दिली नाही. "एपस्टीनने केलेल्या अत्याचारांचा कल्पना नव्हती शिवाय मी पीडित देखील नाही. तसेच, त्याच्या खासगी बेटाला भेट दिली नाही किंवा विमानातून प्रवास केला नाही", असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मेलानिया यांच्यावर एपस्टीन यांच्यावरुन नव्याने कोणतेही मोठे आरोप अलिकडे करण्यात आलेले नाहीत. असे असताना त्यांना पत्रकार परिषद घेऊन यावर स्पष्टीकरण देण्याची गरज का भासली असा सवाल उपस्थित केला जात आहे.